# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी कोल्हापूर

| | |
|---|---|
| [redacted]<br>जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, जिल्हा परिषद, कोल्हापूर | पत्ता - आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागाळा पार्क कोल्हापूर<br>फोन नं. :- ०२३१ - २६६१६४०, २६५६६१७, २६५२३२७<br>फॅक्स नं.:- ०२३१ - २६८०३१२<br>ई मेल :- dhokop@gmail.com, so.kolhapur01@gmail.com |
| आरोग्य सेवा | जा.क्र./जि.प./आरोग्य/वशी १३/जमृ/ /१६<br>दिनांक :- २४/११/२०१६. |


प्रति,

ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत ...परिते..........., ता. करवीर.
जिल्हा कोल्हापूर

विषय :- जन्म दाखल्यामधील बाळाच्या नाव व जन्म दिनांक बदलाबाबत..

संदर्भ :- १) मा. उपसंचालक तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक ०९/०९/२००९ रोजीचे पत्र जा.क्र. आमाजीआ/ कक्ष-८३/नावात बदल/६५७३-७२१०/ २००९

२) मा. उपसंचालक तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक १७/११/२०१५ रोजीचे परिपत्रक क्र. १६ जा.क्र. आमाजीआ/कक्ष-८३/दुरुस्ती सीआरएस/१०४०५-१०४६५/ २०१५

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविणेत येते की,कोणत्याही जन्म दाखल्यातील नाव किंवा जन्म दिनांक यातील बदलाकरिता उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांनुसार कार्यवाही करणेत यावी.याकरिता प्रत्येक वेळी स्वतंत्र मार्गदर्शन मागवू नये. सोबत संदर्भित परिपत्रके जोडत आहोत.

सोबत :- संदर्भित परिपत्रके जोडली आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा
जिल्हा निबंधक जन्म - मृत्यू,
जिल्हा परिषद, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

**१) गट विकास अधिकारी, पंचायत समिती .......(सर्व)**

# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ. पी.एस.चव्हाण
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in

६५७३-७२१० डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८ ३/नावात बदल/ /२००९, दिनांक : ९ सप्टेंबर, २००९

**परिपत्रक महत्वाचे**

प्रति,

१) गटविकास अधिकारी,
पंचायत समिती....................(सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, महानगरपालिका,.....(सर्व)

३) मुख्याधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, नगरपरिषद/नगरपालिका.........(सर्व)

४) व्यवस्थापक, कॅन्टोंमेंट बोर्ड, ....................(सर्व)

विषय :- नावात बदल करण्याबाबत...

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८ ३/नावात बदल /८१५३-३३२/२००८, दि. ८ सप्टेंबर, २००८

उपरोक्त विषयास अनुसरुन या कार्यालयाच्या संदर्भिय पत्रान्वये नावात बदल करण्याबाबत सूचना सर्व निबंधकांना पाठविण्यात आलेल्या होत्या. या परिपत्रकातील सूचनाचा योग्य अर्थ न समजल्याने नावात बदलाबाबतची प्रकरणे चुकीच्या अर्थाने निकालात काढण्यात आलेली आहेत. असे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. तरी या बाबत पुढील मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही अपेक्षित आहे.

१) नविन जन्मलेल्या मुलाच्या नावाबाबत सदर परिपत्रक काढण्यात आलेले होते. या मध्ये मुलाच्या नावाची ( वडिलाचे नाव, आईचे नाव, अडनाव याची नाही) नोंदणी झाल्यावर ते नाव संपूर्णतः बदलता येत नाही असे कळविले होते. सदर नविन जन्मलेल्या मुलाचे नाव नोंदविताना कोणतीही औपचारीक चूक झालेली असेल किंवा काही लेखन प्रमादाने चूक झालेली असेल. (उदा. काना, मात्रा, वेलांटी इ.) तर त्यात कलम १५ अनुसरुन बदल करता येतो. परंतु नविन जन्मलेल्या मुलाचे नाव पुर्णपणे बदल करण्याची तरतूद अधिनियमात नाही याची नोंद घ्यावी. (उदा. मूळ नाव रमेश आहे व नंतर महेश ठेवण्यात आले.)

२) आई वडिल यांचे नावात चूक झालेली असेल तर त्या बाबतचे सबळ पुरावे (शासकिय [illegible]) सादर केल्यावर निबंधक, त्यांची खात्री पटल्यावर त्याबाबत नोंदवहीतील शेरा [illegible] यावाबतची नोंद घेवून त्यानुसार प्रमाणपत्र अदा करु शकतो.

३) जर टोपण नावाची नोंद झालेली असेल अथवा माहेरच्या नावाची नोंद झालेली असेल तर [illegible] बाबतचे सबळ पुरावे संबंधिताने सादर केल्यावर निबंधक कलम १५ व नियम ११(४) च्या अधिन राहून चूक दुरुस्ती करु शकतो.

४) काही वेळेस प्रमाणपत्र घेवून गेल्यावर बऱ्याच वर्षानंतर नावातील चूक दुरुस्ती बाबत अर्ज केले जातात. अशा प्रकरणात सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर तात्काळ याबाबत न कळविण्याची कारणे शोधून काढणे आवश्यक असते. तसेच जुन्या प्रमाणपत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केला याची चौकशी होणे आवश्यक असते. याबाबत संबंधित निबंधकाची खात्री पटल्यावरच कलम १५ अनुसरुन पुढील कार्यवाही होऊ शकते.

५) समाजाचे नाव, अडनाव म्हणून लावता येत नाही किंवा व्यवसायाचे नाव अडनाव म्हणून [illegible] येत नाही. तसेच जात, गाव किंवा इतर कोणत्याही बाबीचा उल्लेख अडनावात करता येत [illegible] (उदा. बागवान, शिंपी, कोळी, वाणी, तेली, पाटील इ.) जर चुकीने असे झालेले अस[illegible] त्याबाबतचे पुरावे सादर केल्यावर कलम १५ व नियम ११(४) यास अनुसरुन पुढील कार्य[illegible] करता येऊ शकते.

६) वरील प्रमाणे चुका, आईवडिलांचे नाव नोंदविताना किंवा अडनाव लिहीताना होण्याची शक्यता असते. अशा चुका योग्य शासकिय पुरावे, प्राप्त झाल्यावर व निबंधकाची त्याच्या सत्यतेबाबत खात्री पटल्यावर त्यात कलम १५ व नियम ११ अन्वये चुक दुरुस्ती करता येऊ शकते.

गटविकास अधिकारी तथा अप्पर जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु, यांनी आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व जन्म व मृत्यु निबंधकास (सर्व ग्रामसेवक) या परिपत्रकाच्या प्रती देण्यात येवून त्यानुसार, कार्यवाही करण्याबाबत कळवावे.

उपसंचालक आरोग्य सेवा करिता<br>
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु<br>
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीसाठी सादर : मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी :- जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु, जिल्हा परिषद ..............(सर्व)

२/- जिल्हाअंतर्गत सर्व गटविकास अधिकारी यांच्या प्रती सोबत जोडून आपल्या कार्यालयास पाठविण्यात येत आहेत. या प्रती संबंधित कार्यालयापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची आहे याची कृपया नोंद घ्यावी.

F:\83\Circular.doc

<table>
<tr><td colspan="3">जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी कोल्हापूर</td></tr>
<tr><td>डॉ. आर. एस.<br>आडकेकर<br><br>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>तथा जिल्हा निबंधक<br>जन्म-मृत्यू, जिल्हा<br>परिषद, कोल्हापूर</td><td>Birth and Death Registration</td><td>पत्ता - आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागाळा पार्क कोल्हापूर<br>फोन नं. :- ०२३१ - २६६१६४०, २६५६६१७, २६५२३२७<br>फॅक्स नं.:- ०२३१ - २६८०३१२<br>ई मेल :- dhokop@gmail.com,<br>so.kolhapur01@gmail.com</td></tr>
<tr><td>आरोग्य सेवा<br>परिपत्रक क्र.१६</td><td colspan="2">जा.क्र./जि.प./आरोग्य/वशी१३/जमृ/ ५७४ ६०० /१५<br>दिनांक :- १७/११/२०१५.</td></tr>
</table>

प्रति,

१) गटविकास अधिकारी
तथा,
अप्पर जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू
पंचायत समिती .............(सर्व)
जिल्हा कोल्हापूर

२) आरोग्य अधिकारी
तथा,
निबंधक जन्म-मृत्यू
महानगरपालिका, कोल्हापूर

३) मुख्याधिकारी
तथा,
निबंधक जन्म-मृत्यू
नगरपालिका......(सर्व)
जिल्हा कोल्हापूर

विषय :- जन्म नोंद वहीत बाळाचे नाव व जन्म तारीख मधील दुरुस्तीबाबत...

संदर्भ :- १) मा.उपसंचालक, आरोग्यसेवा (आ.मा.जी.आ.) पुणे यांचेकडील दिनांक १७/११/२०१५ रोजी ई-मेल द्वारे आलेले परिपत्रक क्र. १६

२) भारताचे मा.उपमहानिबंधक (सीआरएस) नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र.No.1/12/2014-VS-CRS/900, New Delhi dated 30th June 2015

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये बाळाचे नाव व जन्म तारखेतील दुरुस्तीबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन या कार्यालयास पत्रान्वये प्राप्त झाले आहे.

केंद्र शासनास प्राप्त कोर्ट ऑर्डर्स व व्यक्तीगत अर्जाद्वारे असे निदर्शनास आले आहे की, आरोग्य संस्थेतील यंत्रणेकडून बाळाचे नाव नोंदविताना झालेले दुर्लक्ष/निष्काळजीपणा किंवा माहिती देणा-यांच्या अनावधानाने बाळाचे नाव चुकीचे नोंदविले असेल अशा प्रकरणांमध्ये नागरिकांना बालकाचे नाव शाळेत घालताना, पासपोर्ट मिळवणे इत्यादिसाठी अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नागरिकांना निबंधकाकडे नावात बदल/दुरुस्ती करण्याबाबत केंद्र शासनाने संदर्भिय पत्राद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. अर्जदाराची विनंती व

नावाबाबतचे ठोस पुरावे निबंधकाने अवलोकन करुन बाळाचे नाव बदलण्याचे अधिकार निबंधकांना देण्यात आलेले आहे. निबंधकांनी शक्यतो नावात बदल करताना जन्म नोंद अहवालाच्या शेरा रकान्यामध्ये नोंद घेतल्यानंतर प्राधान्याने नावात बदल करतांना "उर्फ" या संज्ञेचा वापर करावा.

अर्जदारास उर्फ नांव मान्य नसेल तर अर्जदाराने दिलेली कागदपत्रे व ठोस पुरावे (**Authenticity of the documents**) पाहून निबंधकाची खात्री पटत असेल तर जन्म नोंदवहीत शेरा रकान्यात, दुरुस्तीची तारीख, दोन्ही नावे यांची नोंद घेऊन निबंधकाने स्वाक्षरी करावी व तारीख लिहावी नंतर नावात योग्य ती दुरुस्ती करावी.

जन्म नोंदणीतील जन्म तारखेबाबत तसेच जन्म व मृत्यू नोंदणीतील तारखेची नोंद ही **Section 35 of the Indian Evidance Act 1872** अन्वये जन्म -मृत्यू घडलेल्या घटनेचा वस्तूस्थितीचा पुरावा असल्याचे ग्राहय धरण्यात आले आहे. या वस्तुस्थितीचा विचार करता जन्म नोंदीमधील जन्म तारखेमध्ये चुकीच्या जन्म नोंदणी बाबतचे जन्म घटनेच्या व नोंदणीच्या वेळचे ठोस पुरावे दिल्यानंतर निबंधकाची खात्री (**Proved to the satisfaction of the registrar**)झाल्याशिवाय जन्म तारखेत बदल करता येत नाही.

जन्म नोंदीमध्ये नावात बदल, "उर्फ" तसेच तारीख हे बदलाची तरतुद असली तरीही निबंधकांकडून सर्रास नाव व तारीख बदलले जाणार नाही याबाबत (Registrars should be asked not to encourage the practice of change in name and date in the birth record) सर्व निबंधकांना सुचना द्यावी. तसेच पूर्वीप्रमाणेच यापूर्वी नावांत बदलाबाबत यापूर्वीच्या दिनांक ०९/०९/२००९ च्या परिपत्रका नुसारच कार्यवाही करण्याबाबत निबंधकांना सूचित करावे.

सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व निबंधकांना पाठवून या कार्यालयास अवगत करावे.

**सोबत :- परिपत्रक क्र.१६ व इंग्रजी पत्र**

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा
जिल्हा निबंधक जन्म - मृत्यू,
जिल्हा परिषद, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा. उपसंचालक, आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक, जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य, पुणे
२) मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर.

**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**
**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

| | |
|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ) तथा उपमुख्य निबंधक (जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |


<u>परिपत्रक</u> क्रं. १६ जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/दुरुस्ती/सीआरएस/10405-19765/१५

दिनांक:- 17 / 11 /२०१५

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्याधिकारी
तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई

विषय :- जन्म नोंद ~~वहीत~~ बाळाचे नाव व जन्म तारीख मधील दुरुस्तीबाबत.
संदर्भ :- भारत सरकारचे उपमहानिबंधक जन्म-मृत्यू यांचे इंग्रजी पत्र क्रं. No.1/12/2014-VS-CRS/900, New Delhi dated 30th June 2015.

उपरोक्त विषया संबंधी संदर्भिय पत्राव्दारे बाळाचे नाव व जन्म तारखेतील दुरुस्ती बाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन या कार्यालयास पत्रान्वये प्राप्त झाले आहे.

केंद्र शासनास प्राप्त कोर्ट ऑडरर्स व व्यक्तीगत अर्जाव्दारे असे निदर्शनास आले आहे की, आरोग्य संस्थेतील यंत्रणेकडून बाळाचे नाव नोंदविताना झालेले दुर्लक्ष/निष्काळजीपणा किंवा माहिती देणा-यांच्या अनावधानाने बाळाचे नाव चूकीचे नोंदविले असेल अशा प्रकरणामध्ये नागरीकांना बालकांचे नाव शाळेत घालताना पासपोर्ट मिळविणे इत्यादीसाठी अडचणी निर्माण होतात त्यामुळे नागरिकांना निबंधकाकडे नावात बदल/दुरुस्ती साठी अर्ज करावा लागतो. त्यांना अचुक जन्म दाखला मिळावा ही बाब विचारात घेऊन बाळाचे नाव दुरुस्ती करण्याबाबत केंद्र शासनाने संदर्भिय पत्राव्दारे मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. अर्जदाराची विनंती व नावाबाबतचे ठोस पुरावे निबंधकाने अवलोकन करुन बाळाचे नाव बदलण्याचे अधिकार निबंधकांना देण्यात आलेले आहे. निबंधकांनी

शक्यतो नावात बदल करताना जन्म नोंद अहवालाच्या शेरा रकान्यामध्ये नोंद घेतल्यानंतर प्राधान्या नांवात बदल करताना 'उर्फ' या संज्ञेचा वापर करावा.

अर्जदारास उर्फ नांव मान्य नसेल तर अर्जदाराने दिलेली कागदपत्रे व ठोस पुरा (Authenticity of the documents) पाहून निबंधकाची खात्री पटत असेल तर जन्म नोंदवहीत शेर रकान्यात, दुरुस्तीची तारीख, दोन्ही नांवे यांची नोंद घेऊन निबंधकाने स्वाक्षरी करावी व तारीख लिहावी नंतर नांवात योग्य ती दुरुस्ती करावी.

जन्म नोंदणीतील जन्म तारखेबाबत तसेच जन्म व मृत्यू नोंदणीतील तारखेची नोंद ही Section 35 of the Indian Evidance Act 1872 अन्वये जन्म-मृत्यू घडलेल्या घटनेच्या वस्तु वस्तुस्थितीचा पुरावा असल्याचे ग्राहय धरण्यात आले आहे. या वस्तुस्थितीचा विचार करता जन्म नोंदीमधील जन्म तारखे मध्ये चुकीच्या जन्म नोंदणी बाबतचे जन्म घटनेच्या व घटना नोंदणीच्या वेळचे ठोस पुरावे दिल्यानंतर निबंधकाची खात्री समाधान (Proved to the satisfaction of the registrar) झाल्याशिवाय जन्म तारखेत बदल करता येत नाही.

जन्म नोंदीमध्ये नांवात बदल, 'उर्फ' तसेच तारीख हे बदलाची तरतुद असली तरीही निबंधकांकडून सर्रास नांव व तारीख बदलले जाणार नाही याबाबत (Registrars should be asked not to encourage the practice of change in name and date in the birth record) सर्व निबंधकांना सूचना द्यावी. तसेच पूर्वीप्रमाणेच यापूर्वी नांवात बदलाबाबत यापूर्वीच्या दिनांक ०९/०९/२००९ च्या परिपत्रका नुसारच कार्यवाही करण्याबाबत निबंधकांना सूचित करावे.

सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त असलल्या सर्व निबंधकांना पाठवून या कार्यालयास अवगत करावे.

सोबत – संदर्भिय दिनांक ३०/०६/२०१५ ची प्रत.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत सविनय सादर :- ........................
- मा. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
- Dy.Registrar General, Government of India, Ministry of Ex#ternal Affairs, Office of the registrar, V.S.Division, West lock, R.K.Puram, New Delhi-110066.

No 1/12/2014-VS (CRS)
भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
गृह मंत्रालय /
MINISTRY OF HOME AFFAIRS
भारत के महारजिस्ट्रार का कार्यालय
जीवनांक प्रभाग, पश्चिमी खण्ड-1, रामकृष्ण पुरम्, नई दिल्ली - 110066
OFFICE OF THE REGISTRAR GENERAL, INDIA
V.S. Division, West Block -I, R.K. Puram, New Delhi – 110066
Tele-fax: 26104012 E-mail – *drg-crs.rgi@censusindia.gov.in* rkgautamiss.rgi@nic.in

Dated: 30-06- 2015

To,

All Chief Registrar of births and deaths

Sub: Correction in name and date of birth of the child in birth record -clarification sought.

Sir,

This office has received requests from many States regarding procedure to be followed in respect of change in name and date of birth of the child in birth record. As you are aware that based on the clarification given by the Union Law Ministry in the past (which was published in the Handbook on Civil Registration) change of name is not allowed in the registration record. However, in respect of change in name, the Ministry of Law has allowed to put 'alias' between both names. This procedure is followed in many States.

2: Taken into consideration the request received from various quarters through Court Orders or individual applications , it is observed that errors in name in birth record occurs due to negligent recording by hospital authorities or by the informant in birth reporting forms. Applications for correction in name are filed by the individuals when the birth certificates are to be produced for school admission, issue of passport etc.
Considering the requirements of birth certificate with correct names, it has been decided that the request of change in name may be considered by the Registrar, if he/ she is satisfied with the authenticity of the documents submitted by the applicant, the Registrar is authorized to consider the request of change in name. As far as possible, the concern Registrar may use the term 'alias' in respect of change in name and prefer to write both names in the birth certificate after making necessary entry in the remarks column of birth register. In case 'alias' is not acceptable to the applicant, then necessary changes in the

name may be done upon the satisfaction of the registrar on the authenticity of th documents furnished by the applicant. After making changes, necessary entry should b made in the remarks column of the birth register and mention the date of correction and both names in the remarks column of birth register.

3. So far as correction in date of birth is concerned, it is clarified that the entries made in the birth and death registers are admissible as evidence under section 35 of the Indian Evidence Act. 1872 and these entries are conclusive evidence of the fact of birth or death, as the case may be. In view of the above fact, correction in date of birth is not to be allowed unless it is proved to the satisfaction of the Registrar that a fraudulent entry regarding date of birth was made at the time of reporting/ registering the event.

4. You are requested to issue the necessary guidelines to the concerned registrati authorities for compliance. However, Registrars should be asked not to encourage t practice of change in name and date of birth in the birth record. It should be done a last resort.

Yours faithfully

(R. K. Gautam)
Deputy Registrar General

प्ती .

मा . जिल्हा आरोग्य अधिकारी सो .

आरोग्य विभाग जि . प . कोल्हापुर .

रिपोर्ट : निबंधक . जन्म . मृत्यु . उपजत मृत्यु विवाह . नोदणी अधिकारी ग्रा . प . परिते ता . करवीर .

विषय : जन्म नोंदी मधील दुरूस्ती करणे कामी मार्गदर्शन प्राप्त होणे बाबत .

महाशय .

उपरोक्त विषयास अनुसरून ग्रा . प . परिते कडील दिं . १९ . ०३ . २०१६ रोजी तुळजाई हॉस्पीटल परिते या दवाखान्यातुन जन्म नोंद प्राप्त झाली असुन त्यातील आई . वडील . नांव . पत्ता या मध्ये नजर चुकीने दवाखान्यातुन बदल झाले बाबत . श्री . अरूण जयसिंग पाटील रा . देवाळे ता . करवीर यांनी सदर नोंदणी मधील दुरूस्ती बाबत मा . तहसिलदार यांचे कडील दिं . २६ . ०७ . २०१६ इ रोजी चे प्रतिज्ञा पत्र जोडले आहे . त्या अनुषगाने ~~बदल~~ खालील प्रमाणे दुरूस्ती करणे कामी मागणी केली आहे .

| अ . नं | जन्म नोंद रजिस्टर मधील नांव | प्रतिज्ञा पत्रातील नांव | पुर्वीचा पत्ता | बदल पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | मधुकर हिंदुराव बारड | अरूण जयसिंग पाटील | बारडवाडी ता . राधानगरी | रा . देवाळे ता . करवीर |
| | सुनिता मधुकर बारड | निता अरूण पाटील | | |

तरी सदर जन्म नोदणीतील दुरूस्ती बाबत मार्गदर्शन आपले स्थरावरून ~~व्हावे~~ मिळावे

सोबत .

१ . जन्म नोंद रजिस्टर झेरॉक्स

२ . प्रतिज्ञा पत्र झेरॉक्स .

निबंधक
जन्म, मृत्यू, विवाह नोंदणी
ग्रा पं परिते, ता करवीर

10/10/16

9403550509